पोलीस अधीक्षक, कार्यालय गडचिरोली
जनसंपर्क शाखा
P.R.O Office, Gadchiroli
**Phone No.** 07132223142 **Address**: SP Office,Gadchiroli
**E-mail** : prospoffice.gadchiroli@gmail.com

# वार्तापत्र

दिनांक १५/०६/२०१९

## गडचिरोली पोलीस दलाने केले दोन नक्षल आरोपीतांना अटक

नक्षलवादयांच्या दंडकारण्य स्पेशल झोन समितीची सदस्या तसेच वेस्टर्न सबझोनल प्रमुख उप्पुगंटी निर्मलाकुमारी उर्फ नर्मदाक्का उर्फ नर्मदा दिदी, वय ५८ वर्षे, रा. कोडापावनुरु, गलावरम मंडल जिल्हा कृष्णा (आंध्रप्रदेश) आणि तिचा पती राणी सत्थ्यनारायणा उर्फ किरण उर्फ किरणदादा, वय ७० वर्षे, रा. नरेंद्रपुरम, अमलापुरम जवळ, राजानगरम मंडल, जिल्हा ईस्ट गोदावरी (आंध्रप्रदेश) या दोन्ही जहाल नक्षलवादी दांपत्यास गडचिरोली पोलीस दलाने अटक केली होती. मा. न्यायालयाने या दोघांना ०७ दिवसांची पोलीस कोठडी दिली होती.

१ मे २०१९ रोजी उप विभाग कुरखेडा अंतर्गत मौजा जांभुळखेडा येथे नक्षलवादयांनी घडवुन आणलेल्या भुसुरुंग स्फोटात गडचिरोली पोलीस दलाचे १५ जवान शहीद व १ खाजगी चालक मयत झाले होते. या गुन्हयातील इतर आरोपीतांच्या सहभागाविषयी या दोन्ही जहाल नक्षलवादयांकडे विचारपुस केली असता त्यांनी लवारी गावातील नक्षल सदस्यांमार्फत गुन्हा घडविला असल्याबाबत माहिती दिली. तसेच इतर तांत्रीक पुराव्यावरून गडचिरोली पोलीस दलाने दोन नक्षल आरोपी (१) दिलीप श्रीराम हिडामी वय २२ वर्षे रा. लवारी ता. कुरखेडा जि. गडचिरोली (२) परसराम मनिराम तुलावी वय २८ वर्षे रा. लवारी ता. कुरखेडा जि. गडचिरोली यांना ताब्यात घेवुन अटक केली. त्यांचेकडुन मोठया प्रमाणावर नक्षल साहित्य जप्त करण्यात आलेले आहे. नमुद गुन्हयात अद्यापपावेतो चार आरोपीतांना अटक करण्यात आलेली आहे. सदर दोन्ही आरोपीतांना मा. न्यायालयाने १२ दिवसांची पोलीस कोठडी दिलेली आहे. घटनेचा पुढील तपास गडचिरोली पोलीस करीत आहेत.